**साई महिला गारमेंट को-ऑप. सोसायटी लि., उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद या संस्थेच्या जागा बदलास मंजुरी देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र. यंत्रमाग- २००९/प्र.क्र.६६/टेक्स-२**
१६ वा माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०४ डिसेंबर, २०१७.

<u>वाचा :-</u> १) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय, क्रमांक:- यंत्रमाग-१३९८/प्र.क्र.१५८/टेक्स-२, दिनांक २४ फेब्रुवारी, १९९९.
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय, क्रमांक:- यंत्रमाग-१३०६/प्र.क्र.१४१/टेक्स-२, दिनांक २२ जानेवारी, २००९.
३) राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांचे पत्र क्रमांक:- एनसीडीसी ५-१८/२०१३-एचएलएम(पीएल)/ २१०/एसए ३०१४३, दिनांक १७ जानेवारी, २०१४.
४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. यंत्रमाग-२००९/प्र.क्र.६६/टेक्स-२, दि.२२/०३/२०१६.
५) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्रमांक:-कार्या-४/ यंत्रमाग / साई महिला/४६०९/२०१७, दिनांक ३० मे, २०१७.

<u>प्रस्तावना:-</u>

उपरोक्त वाचा क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये साई महिला गारमेंट को-ऑप. सोसायटी लि., उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद या संस्थेस शासकीय भागभांडवल व रा.स.वि.नि. कर्जाची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. सदर संस्थेने रक्कम वितरीत करतेवेळी मौजे कडकनाथवाडी ता. वाशी, जि. उस्मानाबाद या ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ३४७/अ/१ मधील ०-४० हे.आर. जमिन खरेदी केल्याबाबतची व त्यावर प्रकल्प उभारणी करण्याबाबतची माहिती सादर केली होती. आता वाचा क्र. ५ अन्वये संचालक (वस्त्रोद्याग) यांनी सदर संस्थेने गारमेंट प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने मौजे पिंपळा बुद्रुक ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील गट नं.१७७ मधील ०-२० हे.आर. खरेदी केलेल्या जमिनीवर प्रकल्प उभारणीकरिता मंजुरी देण्याबाबतची विनंती केलेली होती. त्यास अनुसरून साई महिला गारमेंट को-ऑप. सोसायटी लि., उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद या संस्थेच्या जागा बदलास मंजुरी देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय :-**</u>

उपरोक्त वाचा क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये साई महिला गारमेंट को-ऑप. सोसायटी लि., उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद या संस्थेस शासकीय भागभांडवल व रा.स.वि.नि. कर्जाची रक्कम वितरीत करतेवळी मौजे कडकनाथवाडी ता. वाशी, जि. उस्मानाबाद या ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ३४७/अ/१ मधील ०-४० हे.आर.खरेदी केलेल्या जागेवर गारमेंट प्रकल्प उभारणीस मान्यता देण्यात आलेली होती. आता सदर संस्थेस गारमेंट प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने मौजे पिंपळा बुद्रुक ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील गट नं.१७७ मधील ०-२० हे.आर. खरेदी केलेल्या जमिनीवर प्रकल्प उभारणीकरिता खालील अटींच्या अधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१. यापूर्वीच्या जागेवर बांधकामासाठी सादर झालेल्या ई- निविदा प्रक्रीयेनुसारच सदर जागेवर बांधकाम करून घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर यांची राहील.

२. सदर संस्थेच्या नव्याने खरेदी केलेल्या मौजे पिंपळा बुद्रुक ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील गट नं. १७७ मधील २० आर. जमिनीवर मे.अथर्व कन्स्ट्रकशन, लातूर यांचेकडूनच बांधकाम करून घेण्याचे आहे.त्याबाबतचे बंधपत्र संस्थेने मे.अथर्व कन्स्ट्रकशन, लातूर यांचेकडून घ्यावे व त्याची प्रत संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर यांचेमार्फत शासनास सादर करावी.

३. संस्थेने नव्याने खरेदी केलेल्या जागेची किमंत ही रा.स.वि. नि. ने जमीन व जमीन विकासाकरिता रु.५.०० लाख इतक्या दिलेल्या रक्कमेपेक्षा रु.२०,०००/- इतकी जास्त असल्याचे दिसून येते. सदर रु.२०,०००/- इतकी रक्कम संस्थेने संस्थेच्या स्वनिधीतून खर्च करावी.

४. सदर संस्थेचा गारमेंट प्रकल्प नव्याने खरेदी केलेल्या जमिनीवर उभारणीकरिता लागणारी सर्व प्रमाणपत्रे व परवानग्या याबाबतची पूर्तता संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर यांनी करून घ्यावी.

५. जमीन खरेदीसाठी जादा खर्च होवु नये याची दक्षता घ्यावी

६. संबंधित संस्थेकडुन सदर खरेदी केलेल्या जमिनीवरच संस्थेस वितरीत करण्यात आलेला निधी खर्च होईल याची दक्षता संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर यांनी घ्यावी.

७. या प्रकरणी वाचा क्र. १, २,३ व ४ मधील अटीची पूर्तता करून घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांची राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७१२०४१७१०५६५३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gauri Rahul Mhaske

Digitally signed by Gauri Rahul Mhaske
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e3b06f24c3c5bb026c414c42f865f39144c21fb0f8c3a69c8e6e8dc2c5bb9ddd, serialNumber=b018ba858dd6b20cc7a84f6bc86a86d6a6e9ac3ac56c5dbfcd89f36c74de3e1f, cn=Gauri Rahul Mhaske
Date: 2017.12.04 17:19:12 +05'30'

**( गौरी रा. म्हस्के )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) महालेखापाल, ( लेखापरीक्षा ) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर

२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर

३) अ.मु.स. (वस्त्रोद्योग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२.

४) सह सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

५) कार्यासन अधिकारी (रोख शाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग. (३ प्रती)

६) व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली.

७) विभागीय संचालक (पश्चिम), राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ५ बी.जे.रोड,पुणे.

८) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

९) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
१०) प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), औरंगाबाद.
११) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जिल्हा- उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद.
१२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३) संचालक, लेखा व कोषागारे (संगणक विभाग), नविन प्रशासकीय भवन, मुंबई.
१४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१५) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१६) नियोजन विभाग (कार्या-१४३१), मंत्रालय, मुंबई ३२.
१७) वित्त विभाग ( व्यय-२/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई.
१८) अवर सचिव (२१-स/१७-स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी ( १६-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (२ प्रती)
२१) चेअरमन, साई महिला गारमेंट को-ऑप. सोसायटी लि., उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद.
२२) निवड नस्ती (टेक्स-२).